**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती   सभा क्रमांक :- ०४**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :- १७ /६/२०१३

प्रति,
मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती **सभा क्र.०४ शुक्रवार दि. २१/०६/२०१३ रोजी दुपारी १.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र. नगरसचिव,
मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये.   अहमदनगर महानगरपालिका.

**शुक्रवार दिनांक- २१ /०६/२०१३ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| ११९ | अर्जदार श्री. शामसुंदर जी. जग्गी, भागीदार अशोका टुरीस्ट हॉटेल, रा. झेंडीगेट,अ.नगर यांना नळ कनेक्शन नसतांना प्रभाग समिती क्रमांक-३, वॉर्ड क्रमांक १०, बील क्रमांक २७ आकारणी केलेली सन २०१२-२०१३अखेर पाणीपट्टी रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १२० | अर्जदार डॉ.श्री. अतुल शंकरराव नरसाळे, रा.नरसाळे हॉस्पीटल बालिकाश्रम रोड,अ.नगर यांना प्रभाग समिती क्रमांक-३, वॉर्ड क्रमांक ४२, बील क्रमांक १२२९ चुकून डबल आकारणी केलेली सन २०१२-२०१३अखेर घरपटटी रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १२१ | मे.प्रसन्ना पर्पल मोबीलिटी सोल्यु. प्रा.लि.चे व्यवस्थापक श्री. दिपक मगर यांनी दिनांक २७/५/२०१३ रोजी दिलेल्या पत्रानुसार अहमदनगर महानगरपालिका शहर बससेवा दि. १ जून २०१३ पासून बंद करणे बाबतचा ऑफिस रिपोर्टावर मा.स्थायी समिती ठराव क्र.११८ दि.१/६/२०१३ अन्वये सविस्तर अहवाल निर्णयार्थ फेरसादर. |

सही /-
प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत-** विषय क्रमांक- ११९ ते १२१ च्या प्रस्तावाच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०४**

विषय क्रमांक- ११९ शुक्रवार दिनांक २१/०६/२०१३

ठराव क्रमांक- ११९ शुक्रवार दिनांक २१/०६/२०१३

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री. शामसुंदर जी. जग्गी, भागीदार अशोका टुरीस्ट हॉटेल, रा. झेंडीगेट,अ.नगर यांना नळ कनेक्शन नसतांना प्रभाग समिती क्रमांक-३, वॉर्ड क्रमांक १०, बील क्रमांक २७ आकारणी केलेली सन २०१२-२०१३अखेर पाणीपट्टी रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
प्रभाग समिती क्र.३
पाहणी समिती अहवाल

वॉर्ड क्र.:- १० बील क्र.:- २७
मिळकतधारकांचे नाव श्री / श्रीमती :- अशोका हॉटेल
पत्ता :- झेंडीगेट ,अ.नगर
सादर,

मा.आयुक्त साहेब यांचे आदेशानुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १५२ प्रमाणे रक्कम निर्लेखित करावयाच्या प्रकरणांची तपासणी बाबत जा.क्र. / सा.प्र.वि./पी.ए. १९७६ दि.३०/०१/२०१३ अन्वये आम्हांस प्रदान केलेल्या अधिकारानुसार दिनांक १४/२/२०१३ रोजी वरील ठिकाणी समक्ष स्थळ पाहणी केली असता नळ कनेक्शन आढळुन आलेले नाही. त्यामुळे पाणीपट्टीची सन २०१२-२०१३ अखेर रूपये २,७०,०००/- व त्यावर आकारलेली नोटीस फी / शास्ती कमी करणे उचित वाटते.

येणेप्रमाणे अहवाल सादर करीत आहे.

येणेप्रमाणे फिटर,हेडफिटर,सहा.नगररचनाकार,प्रभाग अधिकारी यांचा अहवाल असे.

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, प्रभाग अधिकारी व पहाणी समिती यांचे अहवालानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, पाहणी समितीचा अहवाल व प्रस्तावीत केलेनुसार सन २०१२-१३ अखेर पाणीपट्टीची रक्कम रूपये २,७०,०००/- निर्लेखित करणेकामी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १५२ नुसार मा.स्थायी समिती समोर सादर करणे उचित वाटते. सबब आदेशार्थ तथा निर्णयास्तव सादर. **/अ**

यावर आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, **"अ"** नुसार मान्य.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

## चर्चा :-

मा.सभापती साहेब :- पाणीपट्टी रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणे विषयी प्रस्ताव आहे.
मा.श्री. सातपुते दि.ना. :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- तुम्ही स्वत: गेले होते का ? किती कनेक्शन आहेत.

प्रभाग अधिकारी श्री. वर्मा :- होय मी स्वत : गेलो होतो. नळ कनेक्शन संपूर्ण तपासणी केली आहे. एक इंची एक नळ कनेक्शन आहे. त्यांचे २ भाग त्यांनी केले आहेत.

मा.सभापती साहेब:-परत चेक करून फेर अहवाल सादर करा डिमांड रजिस्टरला किती नळ कने.होते.

प्रभागअधिकारी श्री. वर्मा :- एक इंची नळ कने. १ आहे.पूर्वीपासून कनेक्शन बंद करण्याचा अर्ज आहे.

मा.सौ. खरमाळे सं.र. व मा.श्री. भोसले ग.पुं. :- वर्मा त्यांचे नळ नाही. असे म्हणणे आहे. नळ नसतांना पाणीपट्टी आली असे म्हटलेले आहे. आम्ही नळ पट्टी कशी कमी करणार.

प्रभाग अधिकारी श्री. वर्मा :- १९९५ पासून डिमांड आहे.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- आम्ही कसे कमी करायचे.

मा.सभापती साहेब :- कनेक्शन पहायला कोणकोण गेले होते.

प्रभाग अधिकारी श्री. वर्मा :- आम्ही पाहिले तिथे नळ कनेक्शन एक आहे. श्री. मनोज शिंदे पाहून आले आहेत.तसेच पहाणी समितीनेही समक्ष पहाणी केली आहे.

मा.सौ. खरमाळे सं.र. :- सर्वांनी जाउन तपासणी करू

मा.श्री. भोसले ग.पुं. :- किती पट्टी आहे.

प्रभाग अधिकारी श्री. वर्मा :- दरवर्षी २२०००

मा.श्री. सातपुते दि.ना. :- फेर तपासणी करून अहवाल सादर करा.

मा.श्री. शेख आरिफ शे.र. :- डिमांड रजिस्टरच्या नोंदीसह कर्मचा-यांनी कशाच्या आधारावर नोंद केली याचा चौकशी अहवालासह फेरसादर करणेत यावे.

मा.सभापती साहेब :- दोन नळ कने. असण्याची शक्यता आहे. याकरीता डिमांड रजिस्टरला करण्यांत आलेल्या नोंदीसह कर्मचा-यांनी दोन नळकनेक्शनच्या नोंदी का घेतल्या याच्या चौकशीसह स्थळ पहाणी करून फेर अहवाल सादर करणेस सर्वानुमेत मंजुर करण्यांत यावा.

**<u>ठराव :-</u>** अर्जदार श्री. शामसुंदर जी. जग्गी, भागीदार अशोका टुरीस्ट हॉटेल, रा.झेंडीगेट,अ.नगर यांना नळ कनेक्शन नसतांना प्रभाग समिती क्रमांक-३, वॉर्ड क्रमांक १०, बील क्रमांक २७ आकारणी केलेली सन २०१२-२०१३अखेर पाणीपट्टी रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्टावर झालेल्या चर्चेनुसार पुढील प्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

अर्जदार श्री.शामसुंदर जी. जग्गी, भागीदार अशोका टुरीस्ट हॉटेल, रा.झेंडीगेट,अ.नगर यांचे नळ कनेक्शनाची डिमांड रजिस्टरला करण्यांत आलेल्या नोंदीसह कर्मचा-यांनी दोन नळकनेक्शनच्या नोंदी कशाच्या आधारावर घेतल्या याच्या चौकशीसह स्थळ पहाणी करून फेर अहवाल सादर करणेस सर्वानुमेत मंजुरी देण्यांत येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. सातपुते दिलीप नानाभाउ सही /-

अनुमोदक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन सही /-

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०४**

विषय क्रमांक- १२० शुक्रवार दिनांक २१/०६/२०१३

ठराव क्रमांक- १२० शुक्रवार दिनांक २१/०६/२०१३

**प्रस्तावाचा विषय :-**अर्जदार डॉ.श्री.अतुल शंकरराव नरसाळे,रा.नरसाळे हॉस्पीटल,बालिकाश्रम रोड, अ.नगर यांना प्रभागसमिती क्र.-३,वॉर्ड क्रमांक ४२,बील क्र. १२२९चुकून डबल आकारणी केलेली सन२०१२-२०१३अखेर घरपटटी रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर मनपा प्रभाग समिती क्र.३ दि. ४/२/२०११

विनंती अहवाल सादर करण्यांत येतो की,डॉ.श्री.अतुल शंकरराव नरसाळे यांनी दि.१७/१/२०१३ रोजी अर्ज सादर केला आहे. त्या अर्जामध्ये पुढील प्रमाणे मागणी केलेली आहे."माझे नरसाळे हॉस्पीटल,बालिकाश्रम रोड या ठिकाणी राहात असुन सदर मिळकतीचे वेळोवेळी टॅक्स भरलेले आहेत.सदर पावत्यांच्या मागील चार वर्षाच्या झेरॉक्स सोबज जोडल्या आहेत. तरी माझ्याकडे थकबाकी कशी आहे हे समजत नाही.माझ्याकडे सदर मिळकतीच्या कराची सन२०१३ अखेरची कोणतीही बाकी नसल्याची खात्री करून घ्यावी व तसे पत्र कृपया मला द्यावे."अशी विनंती केलेली आहे.

याबाबत वस्तुस्थिती अशी की, वॉर्ड क्र.४२ बिल क्र.१२२९ वर डॉ.श्री. अतुल नरसाळे (नरसाळे हॉस्पीटल) या नांवे मिळकतीची नोंद केलेली आहे. त्या मिळकतीवर सन २००५ ते १३ अखेर रू.१,३२,३३२/- इतकी शास्ती वगळता थकबाकी आहे. सदरची थकबाकी वसुल करणेसाठी डॉ.श्री. नरसाळे यांच्याकडे गेलो असता त्यांनी माझ्याकडे कुठलीही थकबाकी नाही असे सांगीतले आहे. तसेच सदरचे हॉस्पीटल बालिकाश्रम रोड येथे आहे. बालिकाश्रम रोड हा भाग वॉर्ड क्र.४२ मध्ये येत नाही सदरचा भाग वॉर्ड क्र.४३ मध्ये येत आहे.

सन २००५-०६ या आर्थिक वर्षात झोन पध्दत निर्माण झालेली आहे. झोन पध्दतीमध्ये पुर्ण शहराचे ५ भाग करण्यांत आलेले आहे. झोन क्र.१ मध्ये अहमदनगर शहराचे गावठाण व लगतच्या भग, झोन क्र.२ मध्ये सावेडी, सारसनगर इत्यादी भाग इ. झोन क्र.३ मध्ये केडगाव व मुकुंदनगर , झोन क्र.४ मध्ये बुरूडगांव , बोल्हेगांव, नागापूर, नालेगांव शिवार व झोन क्र.५ मध्ये घोषीत / अघोषीत झ ाोपडपटटया तसेच हॅाटेल लॉजिंग, हॉस्पीटल, मंगल कार्यालय, चित्रपट गृहे, व्हिडिओ हॉल व पेट्रोल पंप या मिळकतीचे विभाजन करून प्रत्येकाची वेगवेगळी आकारणी करणे बाबत दर मंजुर करण्यात आलेले आहे. सदरचे हॉस्पीटल "ब" श्रेणी देउन पुढील प्रमाणे कर आकारणी केलेली आहे.

| इमारत वय | मजला | वापराचा प्रकार | बांधकाम प्रकार | क्षेत्रफळ | दर | मासिक भाडे |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | त.म. | पेशंट रूम | आर.सी.सी | २९:५७ | २५ | ७३९ |
| १ | त.म. | वाणिज्य | आर.सी.सी. | ४६:३४ | १४ | ६४९ |
| १ | त.म. | वाणिज्य | पत्रा | ३६:५० | ७ | २५६ |
| १ | प.म. | रहिवास | आर.सी.सी. | ८८:२१ | ९ | ७९४ |
| | | | एकुण | २००:६२ | | २४३८ |

२४३८x१२ = २९२५६/-

रिपेअर चार्ज (१०% ) वजा = २९२६/-

करयोग्य मुल्य = २६३३०/-

सन २००५-०६ या आर्थिक वर्षामध्ये नरसाळे हॉस्पीटलचे परिशिष्ट 'अ' वर मोजमापे घेतांना वॉर्ड क्र.४२ टाकण्यांत आलेले आहे व सिंगल डबल फॉर्मवर वॉर्ड क्र.४३ नमुद केलेले आहे.

सदर हॉस्पीटल वॉर्ड क्र.४२ बिल क्र.१२२९ वर नोंद केलेली आहे व वॉर्ड क्र.४३ बिल क्र. ६५० या बिलावर नोंद झालेली आहे. सदरची मिळकत वॉर्ड क्र.४३ मध्येच येत आहे मात्र वॉर्ड क्र.४२ बिल .क्र.१२२९ वर चुकीची (अनावधानाने) / डबल नोंद केलेली आहे.

तरी वॉर्ड क्र.४२ बिल क्र.१२२९ वर केलेली नोंद कमी करणे उचित वाटते व त्या मिळकतीवर असलेली सन २०१२-२०१३ अखेरची रू.१,३२,३३२/- इतकी थकबाकी कमी करणे व त्यावर आकारलेली नोटीस फी / शास्ती कमी करणेस्तव आदेशार्थ सादर. **/अ**

येणेप्रमाणे वसुली लिपिक यांचा अहवाल असे.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की, अ नुसार सादर.

यावर सहा. मु.नि. क.सं. अधिकारी यांचा अभिप्राय की, नरसाळे हॉस्पीटल ही इमारत वॉर्ड नं.४३ मध्ये आहे. सन २००५-०६ या वर्षा हॉस्पीटल, लॉजिंगची कर आकारणी करतांना सदर हॉस्पीटलची मोजमापे वॉर्ड नं. ४२ मध्ये नजर चुकीने घेतली आहेत. त्यामुळे वॉर्ड नं.४२ व वॉर्ड नं.४३ या दोन्ही वॉर्डमध्ये कर आकारणी चालु आहे. वॉर्ड नं. ४३ मधील चालु ठेउन वॉर्ड नं. ४२ मधील कर आकारणीची रक्कम रू.१,३२,३३२/- वसुल होणारी नसल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १५२ नुसार स्थायी समितीच्या मान्यते रू.१,३२,३३२/- इतकी रक्कम निर्लेखित करून वॉर्ड नं.४२ मधील कर आकारणी रद्द करणे आवश्यक आहे. तथापी आदेशार्थ सादर.

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, प्रभाग अधिकारी प्रभाग समिती क्र.३ तसेच सहाय्यक मुल्य निर्धारक तथा कर संकलन अधिकारी यांचे अभिप्रायानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, वसुली लिपिक, प्रभाग अधिकारी , स.मू.नि.क.सं. अधि. तसेच मु.ले.प. यांनी दिलेल्या अहवालानुसार एकच मिळकत दोन प्रभागात दाखविण्यांत आलेने संबंधीतांस एकाच मिळकतीचे दोन बिले देण्यांत येत आहे. प्रत्यक्षात सदरची मिळकत प्रभाग क्र.४३ मध्ये येत आहे. असे अहवालावरून दिसुन येते तरी प्रभाग क्र.४२ मधील कर आकारणीची रक्कम रू.१,३२,३३२/- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदीनुसार निर्लेखित करणे करिता मा.स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी सदरचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा निर्णयास्तव मा.स्थायी समिती समोर ठेवणे आवश्यक आहे.तथापी आदेशार्थ सादर.

यावर आयुक्त साहेब यांची अभिप्राय की , प्रस्तावीत केलेनुसार मान्य.

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- घरपटटी रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. सातपुते दि.ना. :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- काय प्रकरण आहे.

प्रभाग अधिकारी श्री. वर्मा :- वॉर्ड नं.४२ व वॉर्ड नं.४३ मध्येही प्रॉपर्टी दिसते. त्यामुळे दोन्ही वॉर्डला पट्टी लागली आहे. कोप-यावर घर बॉर्डरवर असल्यामुळे दोन्हीकडे कर भरतो आहे. सावेडी प्रभागात याची वसूली होते.

मा.सौ. खरमाळे सं.र. :- प्रभागाच्या सिमारेषा निश्चित नाही का ?

प्रभाग अधिकारी श्री. वर्मा :- हे प्रकरण आमच्या कडे नंतर आले.सिमारेषा निश्चित नसल्याने डबल आकारणी होत आहे.

मा.सभापती साहेब :- यापुढे सिमारेषावर असणा-या मिळकतो बाबत संबंधित प्रभागात खात्री करून घरपट्टी आकरण्यात यावी. यामुळे नागरिकांना डबल घरपट्टीची आकारणी होणार नाही.

मा.श्री. सातपुते दि.ना. :- चुकीची आकारणी केलेली घरपट्टी निर्लेखित करण्यांत यावी.

मा.श्री. शेख आरिफ शे.र. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**<u>ठराव:-</u>**ऑफिस रिपोर्टानुसार अर्जदार डॉ.श्री.अतुल शंकरराव नरसाळे,रा.नरसाळे हॉस्पीटल, बालिकाश्रम रोड, अ.नगर यांना प्रभागसमिती क्र.-३,वॉर्ड क्रमांक ४२,बील क्र. १२२९चुकून डबल आकारणी केलेली सन २०१२-२०१३अखेर घरपटटी ऑफिस रिपोर्टमध्ये नमूद रक्कम रूपये १,३२,३३२/-(रूपये एक लाख बत्तीस हजार तीनशे बत्तीस फक्त) निर्लेखित करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. सातपुते दिलीप नानाभाउ सही /-

अनुमोदक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०४**

विषय क्रमांक- १२१ शुक्रवार दिनांक २१/६/२०१३

ठराव क्रमांक- १२१ शुक्रवार दिनांक २१/६/२०१३

**प्रस्तावाचा विषय :-** मे.प्रसन्ना पर्पल मोबीलिटी सोल्यु. प्रा.लि.चे व्यवस्थापक श्री. दिपक मगर यांनी दिनांक २७/५/२०१३ रोजी दिलेल्या पत्रानुसार अहमदनगर महानगरपालिका शहर बससेवा दि. १ जून २०१३ पासून बंद करणे बाबतचा ऑफिस रिपोर्टावर मा.स्थायी समिती ठराव क्र.११८ दि.१/६/२०१३ अन्वये सविस्तर अहवाल निर्णयार्थ फेरसादर.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर मनपा मोटार व्हेईकल विभाग २८६ दि.१२/६/२०१३

मा.फेरसादर,

**संदर्भ-** १. प्रसन्ना पर्पल मो.सो.लि. चे पत्र जा.क्र.१३, दि. २७/०५/२०१३.
२. नोटीस क्र.०२, ११/०१/२०१३ व नोटीस क्र. ०६,दि. ०८/०२/२०१३.
३. मा. स्थायी समिती सभा दि. ०१/०६/२०१३.
४. प्रसन्ना पर्पल मो.सो.लि. चे पत्र जा.क्र.१४, ०१/०६/२०१३.

मा. सादर,

उपरोक्त संदर्भ व विषयान्वये विनंती रिपोर्ट सादर की,दि.३०/०५/२०१३रोजी महानगरपालिकेचे मा.महापौर यांचे दालनात झालेल्या बैठकीनुसार अभिकर्ता संस्थेने संदर्भिय क्र. ४ चे पत्र दिले असून सदर पत्र मा.स्थायी समिती दि.०१/०६/२०१३ चे निदर्शनास आणून देण्यात आले असून मा.स्थायी समिती निर्देशानुसार पत्रावर सविस्तर अहवाल पुढील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

**१.** अभिकर्ता संस्थेने उपरोक्त संदर्भ क्र.१ चे पत्राव्दारे अभिकर्ता संस्थेला शहर बससेवा सुरू केल्यापासुन आजपावेतो सुमारे १.२५कोटी रूपयांपेक्षा अधिक संचित तोटा झाला असल्याने नाईलाजास्तव शनिवार दि.०१ जून २०१३पासून सदर सेवा बंद करण्यांत येत आहे, असे कळविले आहे.
- शहर बससेवेस इंधन दरवाढ स्पेअर पार्ट, टायर्स इ. किंमतीच्या दरवाढ अवैध प्रवासी वाहतूकीमुळे तोटा झाल्याचे नमूद करण्यांत आलेले आहे. यापूर्वी इंधन दरवाढी नुसार तसेच नियमाप्रमाणे मा. स्थयी समितीच्या मंजूरी नुसार तिकीट दरवाढ देण्यांत आलेली आहे. वाहनतळ, वर्क शॅापकरीता जागा दाखविण्यांत आलेल्या आहेत. मा.पालकमंत्री व महा.राज्य परिवहन महामंडळाचे अध्यक्ष यांचेशी झालेल्या चर्चेनुसार जुन्या स्टॅण्डमागील जागा मिळणेबाबत प्रयत्न चालू आहेत. अवैध प्रवासी वाहतूकी बाबत मा. महापौर व पदाधिकारी यांचे शिष्टमंडळ मा. जिल्हाधिकारी यांना भेटणार असल्याचे बैठकीत नमूद केले आहे. तसेच दि. ०१/०६/२०१३ चे स्थायी समितीमध्ये देखील बससेवेस संपूर्ण सहकार्य करणे बाबत सूचीत केल्याने बससेवा सुरू ठेवण्यात आलेली आहे.

**२.** अभिकर्ता संस्थेचे दि. २७/०५/२०१३ चे पत्राचे अनुषंगाने आपण आपले संदर्भीय पत्राव्दारे शहर बससेवा उपक्रम कोणत्याही परिस्थितीत बंद करू नये, असे कळविले आहे. तसेच आपण अभिकर्ता संस्थेला चर्चेकरीता पाचारण केले.

अभिकर्ता संस्थेचे दि.२७/०५/२०१३ चे पत्रास महानगरपालिकेकडून पा.पु.जा.क्र.२३६ दि. २८/०५/२०१३अन्वये पत्र देवून मागील नोटीशीचा आधार घेवून दि.०१/०६/२०१३ पासून शहर बस वाहतूक बंद करण्यात येईल असे संयुक्तीक व कायदेशीर नाही. सदर उपक्रम चालू करताना संस्थेशी

करारनामा झालेला आहे. त्यानुसार अभिकर्ता संस्था व महानगरपालिका सदरचा उपक्रम पुढील १० वर्षापर्यंत राबविणेस बांधील आहे. करिता शहर बस वाहतूक कोणत्याही परिस्थिती बंद करू नये असे कळविलेले होते.

**३**. दि. ३०/०५/२०१३ रोजी मा. महापौर महोदया, म.न.पा. अहमदनगर यांचे दालनात आपल्या तसेच प्रमुख पदाधिकारी यांचे उपस्थितीत आपण घडवून आणलेल्या चर्चेत अभिकर्ता संस्थेच्या अडचणी, जागेचा प्रश्न अहमदनगर शहरात अनधिकृत रिक्षांचे संख्येत झालेली बेसुमार वाढ, डिझेलचे वाढणारे दर, खालावलेली शहर बसची प्रवासी संख्या हया सर्व विषयांवर सांगोपांग चर्चा झाली असून प्रस्तूत चर्चेमध्ये अत्यंत सकारात्मक भूमिका घेवून मनपा पदाधिका-यांनी शहर बससेवा सुरू ठेवण्याकरीता अभिकर्ता संस्थेला आर्थिक मदत देण्याबाबत सहानुभूतीपूर्वक विचार करण्याचे आश्वासन दिले, त्याबद्दल आपले मनपूर्वक धन्यवाद.

- दि. ३०/०५/२०१३ रोजी मा.महापौर, मा.आयुक्त, मा.सभापती, स्थायी समिती, मा.सभागृह नेते, मा.उपायुक्त व अभिकर्ता संस्थेचे श्री. परदेशी, मगर यांचे उपस्थितीत मिटींगमध्ये बससेवे बाबत सखोल चर्चा झाली असून अभिकर्ता संस्थेचे बससेवेचे नियोजनाबाबत तसेच बससेवेस कशा पध्दतीने मदत करता येईल याबाबत चर्चा झाली असून अभिकर्ता संस्थेस याबाबत सविस्तर पत्रव्यवहार करणेस सांगण्यांत आले आहे.

**४**. प्रस्तूत परिस्थितीत झालेला प्रचंड तोटा पाहता अभिकर्ता संस्था शहर बस वाहतूक सुरू ठेवून तोटयामध्ये वाढ करू इच्छित नाही. तसेच अभिकर्ता संस्थेला कामगार वेतनाचा प्रश्न निर्माण झाला आहे. अभिकर्ता संस्थेला इंधन, सुटेभाग, टायर इत्यादी पुरविणा-या पुरवठादाराची थकबाकी साचली आहे व अशा परिस्थितीत मनपा पदाधिका-यांनी अभिकर्ता संस्थेला आर्थिक मदत देवून विना तोटा सेवा सुरू ठेवण्यास सकारात्मक भूमिका घेतली असल्याने त्या अनुषंगाने खालील बाबी मांडण्यात येत आहेत.

**४.१** शहर बससेवेचा सर्वाधिक खर्च इंधनावर होतो. शहर बससेवा फेब्रूवारी २०११ मध्ये सुरू करण्यात आली तेव्हा डिझेलचा दर प्रति लिटर रू. ४१.५२ इतका होता व सध्याचा दर रूपये ५६.४० इतका झाला आहे. म्हणजे डिझेलच्या दरामध्ये रू. १४.८८ प्रति लिटर वाढ झाली आहे.

डिझेल खर्चाची माहे नोव्हेंबर २०१२ पासूनची आकडेवारी खालील प्रमाणे आहे. [आकडे लाखात]

| अ.नं. | महिना | लिटर [खप] | खर्च | प्रतिलिटर १४.८८प्रमाणे होणारी वाढ |
|---|---|---|---|---|
| १ | नोव्हेंबर २०१२ | ०.२५ | १३.०४ | ३.७४ |
| २ | डिसेंबर २०१२ | ०.३१ | १६.१२ | ४.६२ |
| ३ | जानेवारी २०१३ | ०.३४ | १७.८२ | ५.०१ |
| ४ | फेब्रूवारी २०१३ | ०.२८ | १५.०१ | ४.१९ |
| ५ | मार्च २०१३ | ०.२९ | १५.४५ | ४.२६ |
| ६ | एप्रिल २०१३ | ०.२७ | १४.६७ | ४.०३ |
| ७ | मे २०१३ | ०.२८ | १५.२९ | ४.१२ |

**४.२**. डिझेल दरवाढीमुळे खर्चात होणारी वाढ भरून काढणे करीता शहर बस दरभाडे हा पर्याय आतापर्यंत वापरात येत होता. परंतू सुमारे ४००० इतक्या संख्येने असलेले अनधिकृत रिक्षा चालक शहर बसपेक्षा कमी दरात जास्त संख्येने प्रवासी उचलतात. त्यामुळे शहर बसची प्रवासी संख्या अधिकच घटते. असा प्रत्यक्षात अनुभव आल्याने वाढलेले दर अभिकर्ता संस्थेने कमी करून प्रवासी संख्या कमी न होण्याकरीता प्रयत्न केले आहेत. अशा परिस्थितीत दरमहा डिझेल खर्चातील १० टक्के वाटा मनपाने उचलल्यास दरमहा १.२५ ते १.५० लाख रूपयां पर्यत अभिकर्ता संस्थेचा डिझेल वर खर्च कमी होउ शकेल व ही बाब अभिकर्ता संस्थेचा इतका तोटा कमी करू शकते.

- मनपाने बससेवेला आर्थिक मदत करावी असे नमूद केले आहे. इंधन दरवाढीबाबत १०% वाटा मनपाने उचलावा असे अभिकर्त्यांचे म्हणणे आहे. सदरचे अभिकर्त्यांचे म्हणणे संयुक्तीक वाटत नाही. इंधन दरवाढीनंतर एसटी महामंडळ तिकीट दरवाढ करते. त्याप्रमाणे अभिकर्ता संस्थेला तिकीट दरवाढ नियमानुसार करता येईल. तसेच तोटयात असणारे मार्ग, फे-या इत्यादी बाबत अभिकर्त्यांने नियोजन करणे आवश्यक आहे.

**५. जागेचे भाडे**- अभिकर्ता संस्थेस महानगरपालिकेकडून वाहनतळ, वर्कशॉप, ऑफीस करीता जागा न मिळाल्यामुळे अभिकर्ता संस्थेने ओम गार्डन, येथील खाजगी जागा दरमहा रूपये ६०,०००/- भाडे तत्वावर घेतली असून त्याकरीता आजपर्यत भाडयापोटी अभिकर्ता संस्थेस १३.८० लाख रूपये अदा करावे लागले आहेत. दि. ३०/०५/२०१३ चे वरील बैठकीत मनपा पदाधिका-यांनी सदर भाडे मनपा कडून देण्याचे मान्य केले आहे. सुरवातीपासून अभिकर्ता संस्थेने सदर भाडेची मागणी केलेली असूनही आजपर्यत मनपाकडून सदर जागेचे भाडे मिळालेले नाही. या बाबींवर सदर बैठकीत मनपा पदाधिकारी एकमत झाले असून या अनुषंगाने अभिकर्ता संस्था विनंती करते की, अभिकर्ता संस्थेची साचलेली वरील भाडे रकमेची थकबाकी एक रकमी स्वरूपात मिळाल्यास सध्याचे अवघड परिस्थितीत अभिकर्ता संस्था हया निधीचा उपयोग देणेकरांचे देणे चुकविण्या करीता करू शकेल. त्यामुळे शहर बससेवा चालू ठेवण्याकरीता साहित्य पुरवठा करण्याचा व्यापारी संस्था शहर बसला पूर्ववत साहित्य पुरवठा करू शकतील.

- महानगरपालिका जुन्या स्टॅण्डमागील जागा उपलब्ध करून देणेबाबत प्रयत्नशील आहे. त्याचप्रमाणे इतरही जागा दाखविण्यात अल्या आहेत. अभिकर्ता संस्थेचे मागणी प्रमाणे व करारापमाणे जागा मनपाने उपलब्ध करणे असल्याने दरमहा रूपये ६०,०००/- जागा भाडे तूर्तास देणे योग्य आहे. तसेच मागील भाडया बाबत अभिकर्ता संस्थेचा झालेल्या तोटयाबाबत यापूर्वीच प्रस्ताव तयार केला असून सदर प्रस्ताव मा.मुख्यलेखापरिक्षक यांचेकडेस प्रलंबीत आहे. सदर बाब धोरणात्मक स्वरूपाची असल्याने त्यावर मा.स्थायी समितीत चर्चा व निर्णय होणे संयुक्तीक राहिल.

**६. प्रवासी कर व बालपोषण अधिभार-** अभिकर्ता संस्थेला प्रवासी उत्पन्नाचे ३.५% प्रवासी कर व विक्री झालेल्या प्रत्येक तिकीटावर १५ पैसे दराने बालपोषण अभिभार शासनास दरमहा अदा करावा लागतो. अभिकर्ता संस्थेला पुरेसे उत्पन्न मिळा वा ना मिळो तिकीट रकमेचे ३.५% इतकी रक्कम प्रवासी कर म्हणून भरावी लागते. अभिकर्ता संस्थेला शहर बस वाहतूक चालविण्यात होत असलेल्या तोटयामुळे दि. ०१/०५/२०१२ पासून अभिकर्ता संस्थेवर प्रवासी कर व बालपोषण अधिभार थकीत

आहे. म.न.पा.ने वरीष्ठ पातळीवरून शासन स्तरावर सदर करास करमाफी मिळवून दिल्यास किंवा सदर कराचे रक्कम इतके अनुदान दिल्यास अभिकर्ता संस्थेला दरमहा रू. १.५ लाख इतका निधी मिळू शकेल व तितका तोटा कमी होवू शकेल.

**-** बससेवेस प्रवासी कर व बाल कुपोषण कर शासनाने लावलेला आहे. शासनाकडून करमाफी मिळणेबाबत वरिष्ठ स्तरावरून प्रयत्न करावे लागतील. करिता कर माफी होणेकरिता मा.स्थायी समितीचा ठराव पारित होवून त्यानुसार मा.शासनास विनंती करण्यात येईल.

सदरची रक्कम मा.शासनास देय असल्याने या करिताची रक्कम थेट मा.उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे भरणे उचित राहिल.

**७. सवलती** - अभिकर्ता संथा अंध-अपंग व विदयार्थ्यांना प्रवास भाडे दरात २०% सवलत देते. स्मार्ट कार्ड व्दारा विदयार्थ्यांना अशी सवलत दिली जाते. ज्यांचा सुमारे १ लाख रूपयांइतका बोजा दरमहा अभिकर्ता संस्थेवर पडतो. सदर सवलत रकमेची प्रतिपूर्ती मनपाने केल्यास अभिकर्ता संस्थेचा दरमहा तितका तोटा कमी होणेस मदत होईल.

**-** करारनामा बाब क्र.६ अन्वये सवलतीचा दर ठरविणेचा अधिकार अभिकर्ता यांचा आहे. तसेच याबाबत परतावा मिळणेकामी महानगरपालिकेकडून प्रयत्न झाल्यास बससेवेस आर्थिक मदत मिळू शकेल.

**८. बॅक गॅरंटी-** मनपाकडे अभिकर्ता संस्थेने रू.१० लाख इतकी बॅक गॅरंटी रक्कम जमा केली आहे. सध्या अभिकर्ता संस्था प्रचंड तोटयात असून आपण आपल्या पत्रात शहर बससेवा उपक्रम कोणत्याही परिस्थितीत बंद करू नये असे कळविले आहे. सध्याचे अवघड परिस्थितीत शहर बससेवा सुरू ठेवणे करीता संस्थेला पुरवठा करणा-या व्यापारी संस्थांचे देणे अदा करण्याकरीता मनपाने सदर बॅक गॅरंटीची रक्कम अभिकर्ता संस्थेला दिल्यास अभिकर्ता संस्था त्याव्दारे देणेदारांचे देणे देवू शकेल. परिणामी पुरवठादार पुनश्चः पुरवठा करू शकतील.

- अभिकर्त्याने करारनामा बाब क्र.५ अन्वये सुरक्षा रक्कम रू. १०.०० लाख महानगरपालिकेकडे दिलेली आहे व्यापा-यांची देणी देणेकामी बॅक गॅरंटीतून रक्कम देणेबाबत मागणी केली आहे. सदर मागणी अयोग्य असून नाकारणे योग्य.

**९. नफा-तोटा-** दरमहा येणारे प्रवासी उत्पन्न व होणारा खर्च यांचे विवरण अभिकर्ता संस्था आपणांस सादर करून विना तोटा सेवा देणे शक्य होणे करीता मनपाने तोटा भरपाई निधी [Loss Funding] उभारणी करण्याची अभिकर्ता संस्था विनंती करीत आहे. सर्व शासकीय यंत्रणांचे सहकार्य लाभल्यास व अनधिकृत ॲपे रिक्षा वाहतूकीवर प्रतिबंध आल्यास मनपाला असा निधी खर्च करण्याची आवश्यकता पडणार नाही. परंतू ज्या महिन्यात तोटा होईल त्या तोटा रकमेची प्रतिपूर्ती मनपाने करावी.अशी अभिकर्ता संस्था यापुढे तग धरू शकणार नाही व सदर सेवा निधी अभावी आपोआप बंद होईल. त्याकरीता अभिकर्ता संस्थेचा नाईलाज असेल याची कृपया नोंद घ्यावी. दिनांक ३०/०५/२०१३ चे बैठकीत आपण व मनपा पदाधिका-यांनी दि. ०१/०६/२०१३ पासून बससेवा बंद करू नये बाबत केलेल्या विनंती नुसार हया संस्थेने दिलेली सेवा बंदची नोटीस अबाधीत ठेवून सदर सेवा तुर्तास सुरू ठेवण्यांत येत आहे.

-महानगरपालिकेने तोटा भरपाई निधी उभारणी करावी व त्यातून भरपाई करणेबाबत अभिकर्त्याने विनंती केली आहे. सदरची मागणी अवास्तव आहे. तथापी जागा भाडे अवैध प्रवासी वाहतूक, बालकुपोषण व प्रवासी कराबाबत अनुदान मिळणे याबाबत मनपा संबधीत विभागाकडे पाठपुरावा करून प्रश्न सोडविता येवू शकतील तसेच अभिकर्त्याने देखील बससेवेचे व्यवस्थित नियोजन व्यवस्थित करणे क्रमप्राप्त आहे. बसेसच्या फे-या, न चालणारे मार्ग, अतिरिक्त कर्मचारी, वाहनांवर होणारा खर्च इत्यादी बाबत ताळमेळ ठेवल्यास तोटा कमी होवू शकतो.

दि. ०१/०६/२०१३ मधील स्थायी समितीच्या चर्चेनुसार तसेच प्राप्त पत्रानुसार बससेवेस येणा-या अडचणी [अवैध रिक्षा वाहतूक, जागेचा प्रश्न, आर्थिक मदत] इत्यादी बाबत योग्य निर्णय घेणेबाबत सदरचा प्रस्ताव व मा. स्थायी समितीकडे पाठविणेस मंजूरी मिळावी, ही विनंती

येणे प्रमाणे मोटार व्हेईकल लिपिक यांचा अहवाल असे.

यावर मॅके.इंजि.यांचा अभिप्राय की, अ.नगर शहर बसवाहतूक अभिकर्ता संस्थेने दि.१/६/२०१३ रोजी दिलेल्या पत्रानुसार सविस्तर अहवाल मा.स्थायी समितीच्या निर्णयार्थ ठेवणे उचित वाटते. मान्यतेस्तव सादर.

यावर उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, सविस्तर प्रस्तावानुसार सदरचा अहवाल निर्णयार्थ मा.स्थायी समिती समोर निर्णयार्थ ठेवणे उचित. सबब आदेशार्थ तथा निर्णयास्तव

यावर आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर .

--**--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- मे.प्रसन्ना पर्पल मोबीलिटी सोल्यु. प्रा.लि.चे व्यवस्थापक यांनी दिलेल्या पत्रानुसार अ.नगर म.न.पा. शहर बससेवा दि. १ जून २०१३ पासून बंद करणे विषयी फेरप्रस्ताव आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री. सातपुते दि.ना. :- मागील भाडे दयायच का ?

उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे :- त्यानी मागणी केलेली आहे.

मा.सभापती साहेब :- जागा किंवा भाडे द्यावे लागेल , करारामध्ये आपण द्यावे असे आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- त्यांचे जे नुकसान होते ते पण दयायचे आहे ना. जेव्हा मिटींग घेतो तेव्हा रिक्षावाल्यांचाही विचार करा. २५०० रिक्षावाले आहेत. त्यांच्या पैकी काही रिक्षा पकडल्या आहेत. त्यांचे प्रतिनिधी संयुक्त बैठकीत बोलवत जा त्यांच्याशी चर्चा करा. मंगळवार पर्यत रिक्षा सोडणार नाही. फक्त अभिकर्त्या च्या सांगण्या वरून मोठी कारवाई होणार असेल तर रिक्षावाल्यांचाही विचार करा पकडलेल्या रिक्षा दंड देत आहे.

मा.श्री. सातपुते दि.ना. :- जर महानगरपालिकेने दोन महिन्यांत जागा दिली तर ती रक्कम खर्च त्यांचा कमी होईल.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- मागील भाडे देउ नका येथून पुढे जागा द्या.

उपायुक्त (कर) सौ.झगडे मॅडम :- जागा कोणती उपलब्ध आहे.

मा.सभापती साहेब :- भाडे आपल्या करारात ठरलेले आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- भाडे कधीपासून दयायचे.

मॅके. इंजि. श्री. निकम पी.जे. :- जागेचा विषय हा बस डेपोचा विषय आहे. ओम पेट्रोल पंपाजवळील जागेचे भाडे करारानुसार दरमहा रू.६०,०००/- आहे. बस सोडण्याकरीता एस.टी महामंडळ जागा देणार आहे व डेपो करीता ओम पेट्रोल पंपाजवळीची जागा भाडयाने घेउन वापरतात त्याकरीता ते रू.६००००/- भाडे देतात.

मा.श्री. सातपुते दि.ना. :- जागा ताबडतोब उपलब्ध करून दया.

मा.श्री. डागवाले कि.आ :- आपल्या मनपाच्या जागा असताना भाडयाच्या जागा का घ्यायच्या.

मॅके.इंजि.श्री.निकम पी.जे.:- कल्याण रोड,वारूळाचा मारूती, मार्केट यार्ड हया तीन जागा नगररचनाने दाखवल्या होत्या.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- महानगरपालिकेच्या फक्त तीनच जागा आहे का ? अजून जागा दाखवा.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- अभिकर्ता अजून नवीन मुद्दे नुसार मागणी करतील.

मा.सभापती साहेब :- नगररचनाकार यांनी जागेतबाबत माहिती दयावी.

नगररचना विभाग श्री.कर्पे :-आपल्या मालकीच्या जागा सध्या नाहीत त्यांची अपेक्षा४-५ एकरची आहे.

उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे :- एखादा एकर असली तर जागा चालेला का ?

मॅके.इंजि. श्री. निकम पी.जे. :- १ ते २ एकर चालेल.

मा.सौ. खरमाळे सं.र. :- माझ्या माहितीत मनपाची एक एक जागा आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- आपल्या एवढया मोठया पालिकेत जागा नाहीत का ? तीन महिन्याचे भाडे दया. तीन महिन्यात जागा दया.

मॅके. इंजि. श्री. निकम पी.जे. :- त्यांना एस.टी. स्टॅण्ड जवळ जागा पाहिजे.

मा.श्री.डागवाले कि.आ. :- जुनी कचरा डेपोची आपली जागा आहे. ७ ते ८ एकर जागा आहे.

मा.श्री. सातपुते दि.ना. :- ही जागा दाखवली का ?

मॅके. इंजि. श्री. निकम पी.जे. :- नगररचना विभाग सांगते तिथे आरक्षण आहे.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- जरी आरक्षण असले तरी पूर्वी कचरा आपण टाकत होतो मग नुसत गाडया लावयाला काय अडचण आहे. उता-यावर महानगरपालिकेचे नाव आहे.

मा.सौ. खरमाळे सं.र. :- जेव्हा आरक्षणाचे काम होईल. तेव्हा होईल तो पर्यत ती जागा द्या.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- तेथे वॉचमन आहे. उत्ता-यावर आपलेच नाव आहे.

मा.सभापती साहेब :- सध्या भाडे दयावे. लवकरात लवकर नगररचना विभागाने जागा उपलब्ध करून दयावी.

मॅके.इंजि.श्री. निकम पी.जे. :- बँक गॅरटीच्या रकमेची मागणी केली आहे.

मा.सौ. खरमाळे सं.र. :- रिपोर्ट मधील मुख्य भाग वाचा.

मॅके. इंजि. श्री. निकम पी.जे. :- सदर मागणी अयोग्य असून नाकारणे योग्य राहील.प्रवासी कर व बालकुपोषण कर महानगरपालिकेने भरणेबाबतची मागणी आहे.

मा.सभापती साहेब :- प्रशासनाचे काय म्हणणे आहे.

मॅके.इंजि. श्री. निकम पी.जे. :- मा. शासनाकडे हा कर माफ करणेचा ठराव पाठवावा लागेल. याबाबत मा.स्थायी समितीने निर्णय घ्यावा.

मा.सभापती साहेब :- मा. शासनाने जो कर लावला त्याबाबत मा. शासनाकडे ठराव पाठवून माफ करणे संदर्भात प्रशासनाने पाठपुरावा करावा

मॅके.इंजि. श्री. निकम पी.जे. :- अंध- अपंग व विद्यार्थ्यांना प्रवास भाडे दरात २०% सवलत देते. त्याची प्रतिपूर्ती ची मागणी आहे.

मा.सौ. खरमाळे सं.र. :- करारनामामध्ये कसे ठरले

मॅके.इंजि. श्री. निकम पी.जे. :- अभिकर्त्याने सवलत देणेस महानगरपालिकेने सांगितले आहे.

मा.श्री. भोसले ग.पुं. व मा.श्री. डागवाले कि.आ. :- करारात मान्य केले आहे. करारनामानुसार सवलत देत आहेत. तर त्या नुकसानीची जबाबदारी त्यांची आहे. आपण कशासाठी नुकसान भरपाई दयायची.

मा.सौ. खरमाळे सं.र. :- कशासाठी द्यायचे.

मा.सभापती साहेब :- निकम साहेब ही सवलत द्यावी का मत काय आहे.

मॅके.इंजि. श्री. निकम पी.जे. :- करारात आहे.

मा.श्री. भोसले ग.पुं. व मा.सौ. खरमाळे सं.र. :- जर करारात असेल तर द्यावे का ?

मॅके.इंजि. श्री. निकम पी.जे. :- स्थायी समिती ही अंतीम ऑथॉरिटी आहे. म्हणून ते ही सवलतीची रक्कम परत मागत आहेत. तसेच जी रक्कम तोटा येईल. ती भरपाई मनपा ने करावी प्रशासनाने म्हणले सदर मागणी आवस्तव आहे. तथापी अन्य मागण्याबाबत मा.स्थायी समितीने निर्णय घ्यावा.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- तोटा रक्कम देउ नये. याकरीता धोरणात्मक बाब असल्याने मा. महासभेने निर्णय घेणे योग्य राहील.

मा.सौ. खरमाळे सं.र. :- डिझेल दरवाढीमुळे खर्चात होणारी वाढ तसेच अंध- अपंग व विद्यार्थ्यांना प्रवास भाडे दरात देण्यांत येणारी सवलतीची भरपाई , बँक गॅरटीची रक्कम महानगरपालिकेने तोटा भरपाई निधी उभारणे बाबत मा. महासभेने निर्णय घेणे योग्य होईल. तसा प्रस्ताव नगरसचिव मार्फत मा.महासभेपुढे सादर करण्यांत यावा.

मा.सभापती साहेब :- शहरातील गोरगरीब नागरिकांच्या सेवेसाठी ही सेवा सुरू रहाणे गरजेचे आहे. या करीता महानगरपालिका आवश्यक ते प्रयत्न करीत असून अवैध प्रवासी वाहतूकीबाबत वेळोवेळी बैठका घेवून पाठपुरावा करीत आहे. स्थायी समिती अभिकर्ता संस्थेस वेळोवेळी प्रवाशी तिकीट भाडे वाढ देत आहे व त्यांना येणा-या अडचणी बाबत सकारात्मक भुमिका घेत आलेली आहे. संस्थेने पत्रामध्ये नमुद केलेल्या अडीअडचणी व मागणी याचा विचार करता व ऑफिस रिपोर्टानुसार त्यांना दरमहा जागे भाडे देण्यांत यावे.नगररचना विभागाने लवकरात लवकर अभिकर्ता संस्थेस जागा उपलब्ध करून देणेबाबत कार्यवाही करावी.प्रवासी कर व बालपोषण अधिभार माफ करणेबाबत मा. शासनाकडे तात्काळ प्रस्ताव सादर करण्यांत येवून त्याचा पाठपुरावा करणेस तसेच डिझेल दरवाढीमुळे खर्चात होणारी वाढीमुळे दरमहा डिझेल खर्चातील १० टक्के वाटा महानगरपालिकेने देणेबाबत,अंध- अपंग व विद्यार्थ्यांना प्रवास भाडे दरात देण्यांत येणारे सवलतीची प्रतिपूर्ती महानगरपालिकेने देणेबाबत, बॅक गॅरटीतून रक्कम

देणेबाबत तसेच ज्या महिन्यात तोटा होईल त्या तोटा रकमेची प्रतिपूर्ती महानगरपालिकेने करणे अशा बाबी पत्रात नमुद केलेल्या आहेत यासर्व बाबी धोरणात्मक स्वरूपाची असल्याने नगरसचिव यांनी सदरचा प्रस्ताव व ठरावासह संपूर्ण प्रकरण मा.महासभे पुढे ठेवणेबाबत तात्काळ कार्यवाही करावी.

**ठराव :-** मे.प्रसन्ना पर्पल मोबीलिटी सोल्यु. प्रा.लि.चे व्यवस्थापक श्री. दिपक मगर यांनी दिनांक २७/५/२०१३ रोजी दिलेल्या पत्रानुसार अहमदनगर महानगरपालिका शहर बससेवा दि. १ जून २०१३ पासून बंद करणे बाबतचा ऑफिस रिपोर्टावर मा.स्थायी समिती ठराव क्र.११८ दि.१/६/२०१३ अन्वये सविस्तर अहवाल निर्णयार्थ सादर केलेल्या फेरप्रस्तावावर सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

शहरातील गोरगरीब नागरिकांच्या सेवेसाठी ही सेवा सुरू रहाणे गरजेचे आहे. या करीता महानगरपालिका आवश्यक ते प्रयत्न करीत असून अवैध प्रवासी वाहतूकीबाबत वेळोवेळी बैठका घेवून पाठपुरावा करीत आहे. स्थायी समिती अभिकर्ता संस्थेस वेळोवेळी प्रवाशी तिकीट भाडे वाढ देत आहे व त्यांना येणा-या अडचणी बाबत सकारात्मक भुमिका घेत आलेली आहे. संस्थेने पत्रामध्ये नमुद केलेल्या अडीअडचणी व मागणी याचा विचार करता व ऑफिस रिपोर्टानुसार त्यांना त्यांनी घेतलेल्या खाजगी जागेचे दरमहा जागे भाडे रक्कम रू.६०,०००/- देण्यांस मान्यता देत आहे.नगररचना विभागाने लवकरात लवकर अभिकर्ता संस्थेस जागा उपलब्ध करून देणेबाबत कार्यवाही करावी.प्रवासी कर व बालपोषण अधिभार माफ करणेबाबत मा. शासनाकडे तात्काळ प्रस्ताव सादर करण्यांत येवून त्याचा पाठपुरावा करणेस मंजुरी देण्यांत येत आहे.

तसेच डिझेल दरवाढीमुळे खर्चात होणारी वाढीमुळे दरमहा डिझेल खर्चातील १० टक्के वाटा महानगरपालिकेने देणेबाबत,अंध- अपंग व विद्यार्थ्यांना प्रवास भाडे दरात देण्यांत येणारे सवलतीची प्रतिपूर्ती महानगरपालिकेने देणेबाबत, बॅक गॅरटीतून रक्कम देणेबाबत तसेच ज्या महिन्यात तोटा होईल त्या तोटा रकमेची प्रतिपूर्ती महानगरपालिकेने करणे ही अशा बाबी पत्रात नमुद केलेल्या आहेत यासर्व बाबी धोरणात्मक स्वरूपाची असल्याने नगरसचिव यांनी सदरचा प्रस्ताव व ठरावासह संपूर्ण प्रकरण मा.महासभे पुढे ठेवणेबाबत तात्काळ कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री. डागवाले किशोर आसाराम सही /-

अनुमोदक :- मा.सौ. खरमाळे संगीता रत्नाकर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-<br>
सभापती,<br>
स्थायी समिती<br>
अहमदनगर महानगरपालिका